" स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " – कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे,

# सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड

कार्यालय : (०२१६४) २७१३४६
निवास : (०२१६४) २७१७२४
ई मेल :str.sgmck-@Sancharnet.in

स्थापना : १९५४

पिन – ४१५ १२४ जि. सातारा (महाराष्ट्र) पो.ऑ.बॉ.नं. ३

कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ) नॅक मानांकन : B+

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)

संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट्.

प्राचार्य
डॉ. एम. एम. राजमाने
एम.एस्सी.,पीएच.डी.

संदर्भ क्र. ७५० / २००९ / १०
दिनांक : १४/०५/२००९

## ॥ प्रमाणपत्र ॥

प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती. रामुगडे सुनिता शंकर या कॉलेजच्या सन् २००५-०६ या शैक्षणिक वर्षात एम.फिल.(मराठी) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित विद्यार्थिनी होत्या. त्यांनी " सौ. बेबी कांबळे यांच्या ' जिणं आमुचं ' या आत्मकथनाचा अभ्यास " या टॉपिक (विषय) वर डॉ. रघुनाथ केंगार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंधिका पूर्ण केली आहे. तरी त्यांची प्रबंधिका एम.फिल. परीक्षेसाठी स्वीकारण्यात यावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

प्रमुख,
मराठी पदव्युत्तर अध्यापन व संशोधन केंद्र
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

प्राचार्य,
सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड

स्थळ : कराड
दिनांक : १३ मे २००९

# प्रमाणपत्र

**डॉ. रघुनाथ आण्णा केंगार**
एम्.ए. पीएच. डी.
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख
वेणूताई चव्हाण कॉलेज, विद्यानगर
कराड जि. सातारा

सुनिता शंकर रामुगडे यांनी "सौ. बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनाचा अभ्यास" या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली ही प्रबंधिका त्यांनी स्वत:च पूर्ण केली आहे.

हा प्रबंध विद्यापीठाच्या एम्.फिल. पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते. सदरची प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग यांनी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

**स्थल – कराड**

**दिनांक** – २५\५\०९

**डॉ. रघुनाथ आण्णा केंगार**
एम्.ए. पीएच. डी.
(मार्गदर्शक)
**HEAD**
**Department of Marathi**
Venutai Chavan College,
KARAD :415124

# प्रतिज्ञापत्र

मी सुनिता शंकर रामुगडे "सौ. बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनाचा अभ्यास" या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. सदरची प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

**स्थळ – कराड**

**दिनांक** – २५/५/०९

S.Ramugade
सुनिता शंकर रामुगडे
(अभ्यासक)

# भूमिका

सौ. बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' हा विषय एम्.फिल्. च्या प्रबंधिकेसाठी निवडण्यामागे मराठी विभाग प्रमुख (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) तसेच मार्गदर्शक डॉ. रघुनाथ केंगार यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून विषय निश्चित केला.

माझे सर्व शिक्षण मुंबईसारख्या शहरात झाले आहे. त्यामुळे सुट्टीच्या वेळी आम्ही जेव्हा गावी येत तेव्हा गावातील वातावरण आणि शहरी वातावरण यातील फरक थोडयाफार प्रमाणात जाणवत आणि मुळात मी देखील एक दलित कुटुंबातील असल्याने ग्रामीण भागातील या जातीभेदाची झळ अगदी अल्प प्रमाणात का होईना पण अगदी जवळून पाहिली. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना 'मराठी' हाच विषय निवडला. त्यामुळे मराठी साहित्याची थोडयाफार प्रमाणात ओळख होऊ लागली व साहित्याच्या वेगवेगळया प्रकारातील पुस्तकांचे वाचन होऊ लागले. जेव्हा शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', दया पवार यांच 'वलुतं', लक्ष्मण गायकवाड – 'उचल्या' या आत्मकथनांचे वाचन झाले. त्यावेळी दलित साहित्य म्हणजे काय आणि चार्तुवर्ण्यव्यवस्थेमुळे दलितांना किती अडचणींना तोंड देत जीवन जगावे लागत होते याची माहिती मिळत गेली. याच दरम्यान बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' हे आत्मकथन वाचनात आले व मन अगदी हेलावून गेले. या आत्मकथनात त्यांनी स्वत:पेक्षा जास्त समाजाविषयी कथन केलेले आहे. त्यातही त्यांनी त्यावेळच्या दलित स्त्रियांना जीवन जगताना कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांना तोंड देत आयुष्य जगणे म्हणजे अगदी दिव्यच होते आणि म्हणूनच 'जिणं आमुचं' या आत्मकथनाचा अभ्यास

एम्.फिल्. प्रबंधिकेसाठी निश्चित करण्यासाठी डॉ. रघुनाथ केंगार यांच्याशी चर्चा केली व हा विषय निश्चित केला.

सौ. बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनाच्या आधारे त्यातील वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रबंधिकेतील विवेचन विशेष सर्वमान्य होईलच असे नाही मात्र या ठिकाणी एका निखळ संशोधकाच्या भूमिकेतून सौ. बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनाचा अभ्यास या विषयाचा अभ्यास करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना विषय निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व देण्यापर्यंत मार्गदर्शक डॉ. रघुनाथ केंगार यांनी केलेल्या अचूक व मौलिक मार्गदर्शनामुळे स्वत: घेतलेल्या कष्टामुळे व वेळोवेळी प्रबंधिका पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेमुळे ही प्रबंधिका पूर्ण होऊ शकली. त्यांची सदोदित ऋणी राहणे हे मी माझे सद्भाग्यच समजते.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रविंद्र ठाकुर आणि विभागातील अध्यापक व स्टाफ यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले.

एम्.फिल्. अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी प्रेरणा व सहकार्य देणारे आदरणीय प्राचार्य राजमाने (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड), मराठी विभाग प्रमुख प्रा. संभाजीराव देसाई (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड), प्रा. शोभना रैनाक, प्रा. सरला निकम, डॉ. रेश्मा दिवेकर, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. डी.आर. गायकवाड या सर्वांचे मार्ग दर्शन व सहकार्य कधीही न फिटण्यासारखे आहे.

माझे पती श्री. महेश पांडुरंग पवार यांनी मला सतत प्रेरणा दिली व वेळोवेळी उपलब्ध करून दिलेल्या पुस्तकांचा, मासिकांचा तसेच कात्रणांचा मला उपयोग झाला. त्याबद्दल मी त्यांची अत्यंत आभारी आहे.

माझे मोठे भाऊ प्रा. कृष्णा निर्मळे (शहाजी महाविद्यालय, कोल्हापूर), मामा माजी प्राचार्य लक्ष्मण रायमाने (मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद), माझे

मोठे दीर श्री. गणेश पवार, आई श्रीमती इंदूताई पांडुरंग पवार यांनीही एम्.फिल्. पूर्ण करण्यासाठी व सतत मला शिक्षणासाठी प्रेरणा देणारे माझे आई–वडिल श्री. शंकर रामुगडे व सौ. विमल रामुगडे या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

या प्रबंधिकेसाठी आवश्यक असणारी महत्वाची अशी संदर्भपुस्तके मिळवून देण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले. कराड नगरपरिषद वाचनाल, सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, वेणुताई चव्हाण कॉलेज, कराडचे ग्रंथपाल या सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

तसेच सौ. वनिता विजय शिंदे व श्री. उमेश सावंत यांनी ही प्रबंधिका टायपिंग करून जे बहुमोल असे सहकार्य केले त्याबद्दल मी त्याची ऋणी आहे.